# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिनांक ०४-१२-२००९

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.४/१२/२००९ रोजी तहकुब झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१८) इतिवृत्त**

शुक्रवार, दिनांक ४ डिसेंबर २००९ रोजी स्थायी समितीची सभा **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.०५ वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्री. जावेद हसन खान
०९. श्री. पांडे विनायक प्रभाकर
१०. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
११. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१२. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१३. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**विषय क्र. २१९ :**

दिनांक १३/११/२००९ (का.प.क्र.१६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत कामागार कल्याण केंद्र ते सलीम अली सरोवर पर्यंतची नाली रूंद करणे या कामाचे म.जि. प्राधिकरण विभागाच्या सन २००८-२००९ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.११,९९,२९७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा शहरी भागात खुल्या

गटारी बांधणे या लेखाशिर्ष अंतर्गत अर्थसंकल्प सन २००९-२०१० पान क्र.GBR B -७ अनु.क्र.१ मधील तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक र.रू.११,९९,२९७/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत कामागार कल्याण केंद्र ते सलीम अली सरोवर पर्यंतची नाली रूंद करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११९९,२९७/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २२१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी १०० व १५० मी.मी. व्यासाची डी आय के-९ जलवाहिनी टाकणे बाबत त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रू.१४,४४,४००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता झाली. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रू.१४,४४,४००/- चे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी १०० व १५० मी.मी. व्यासाची डी आय के-९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,४४,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २२२ :</u>**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-११ येथील मनपा आरोग्य केंद्रावर पहिला मजला बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ जिल्हा दरसुची नुसार रक्क्म रू.२९,९९,५००/- चे अदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.६९७ दिनांक ७.११.२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ७ निविदा विक्री झाल्या व स्वीकृतीच्या तारखेला एकुण ७ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | हायवे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १३.०९% कमी दराने |
| २. | काझी मो.फारूख मो.इस्माईल | अं.प.दरापेक्षा १२.९९% कमी दराने |
| ३. | सुमीत कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १२.२१% कमी दराने |
| ४. | मोना कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ११.२०% कमी दराने |
| ५. | आर.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ४.९९% कमी दराने |
| ६. | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ४.९९% कमी दराने |
| ७. | एकनाथ मा. दहिफळे | अं.प.दरापेक्षा ११.११% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.०९% कमी दराची निविदा मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची असून सदर प्राप्त निविदा मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.०९% कमी दराची निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-११ येथील मनपा आरोग्य केंद्रावर पहिला मजला बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.०९% कमी दराची मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणारे अनुदान एक्सीस बँक मार्फत वितरीत होणार आहे. त्यानुसार समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत रू.१४३.८६ कोटी इतक्या रक्कमेचा निधी एक्सीस बँकेच्या खात्यावर जमा झालेला आहे. सदरील निधीचा सहा महिने इतक्या कालावधीसाठी आवश्यकता नसल्याचे व सदरील रक्कम सहा महिन्याच्या कालावधीकरीता गुंतवणूक करण्यास हरकत नसल्याचे कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांनी कळविलेले आहे. त्यानुसार खालील बँकाचे सहा महिने व एक वर्ष या कालावधीसाठी गुंतवणूकी करीता व्याजाचे दर मागविण्यात आले, ते खालील प्रमाणे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | कालावधी | व्याज दर |
|---|---|---|---|
| १. | ॲक्सीस बँक लि. | ६ महिने<br>१२ महिने | ४.५०%<br>६.००% |
| २. | आय.डी.बी.आय.बँक | ६ महिने<br>१२ महिने | ५.७५%<br>६.५०% |
| ३. | युनायटेड बँक ऑफ इंडिया | ६ महिने<br>१२ महिने | ५.७५%<br>६.२५% |
| ४. | स्टेट बँक ऑफ इंडिया | ६ महिने<br>१२ महिने | ५.२५%<br>६.००% |
| ५. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद | ६ महिने<br>१२ महिने | ६.००%<br>७.००% |
| ६. | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ६ महिने<br>१२ महिने | ६.५०%<br>७.५०% |
| ७. | बँक ऑफ महाराष्ट्र | ६ महिने<br>१२ महिने | ४.५०%<br>५.५०% |

तुलनात्मकदृष्ट्या व्याज दराचे विचार केल्यास महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्याज दर सर्वात जास्त आहेत. तथापी सदरील बँक अनुसूचित असून एवढ्या मोठ्या प्रमाणावरील रक्कम शेड्यूल्ड बँकेत ठेवणे जोखमीचे राहिल. केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी शक्यतो राष्ट्रीयीकृत बँकेतच ठेवणे बाबत मार्गदर्शक सुचना आहेत. करिता स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ही राष्ट्रीयीकृत व कोषागाराची बँक असल्यामुळे समांतर जलवाहिनीसाठी प्राप्त झालेला उक्त रू.१,४३,८६,८०,०००/- इतकी रक्कम सहा महिने ते एक वर्ष कालावधीसाठी टर्म डिपॉजिट रिसिप्ट या स्वरूपात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : समांतर जलवाहीनीसाठी शासनाने 143.86 कोटी रूपये दिलेले आहे. शासनाकडे ज्यावेळेस समांतर जलवाहिनीचा प्रस्ताव पाठविला त्यावेळेस शहरात जे काही पाण्याची समस्या आहे. नागरीकांना रेकॉर्डवर एक दिवसाआड आणि प्रॅक्टीकलमधे दोन दिवसाआड महिण्यातुन दहा दिवस पाणी देण्यात येते त्यामुळे समांतर जलवाहिनीची स्किम केली. स्किमसाठी

प्रवासाकरिता लोक प्रतिनिधी व प्रशासनाने जवळपास 50 लक्ष रूपये खर्च केलेले आहे सदरचा खर्च करणेही गरजेचे होते. डिपॉझिट करण्याकरीता जो विषय आलेला आहे तर प्रत्येक झोनमधे पाण्यासाठी अंदोलन मोर्चे काढले जात आहे व मनपाच्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत. सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा आणि तत्कालीन व विद्यमान मा.आयुक्त यांचा प्रस्ताव करतांना उद्देश काय होता याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे. सर्वसाधारण सभेने उदार मनाने मान्यता दिली. प्रशासनास जे आवश्यक वाटले त्यास मंजूरी देण्यात आली. प्रशासनाचे समांतर जलवाहिनीचे सर्व ठराव मान्य करण्यात आले. प्रशासनाने ज्या एजन्सी समोर आणल्या आहेत त्यांचे घोळ आम्हाला माहिती आहे. नागरीकांना दररोज पाणी देण्यात येईल म्हणुन आश्वासन दिलेले आहे ते काम आमच्या कार्यकाळात व्हावे असा आमचा हेतु होता. शासनाचे कौतुक करेल जी पश्चिम महाराष्ट्राची प्रथा आहे ती शहरात सर्वांनी एकत्र येवुन ती शहरात आणली. शासनास अस वाटल पाहिजे की, या ठिकाणी काम सुरू झाले आहे परंतु 17 तारखेला टेंडर ओपनींगची डेट 2 तारीख करण्यात आली म्हणजे सहा महिणे टेंडर ओपनींग करायचे नाही. एजन्सी मंजूर केल्या कारण त्या क्षमतेचे अधिकारी कर्मचारी, टेंडर करणारी प्रक्रीया प्रशासनाकडे नाही याबाबतीत सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा यांना माहिती दिलेली नाही. यामधे काहीतरी राजकरण दिसत आहे प्रशासनाचा काहीतरी हेतु दिसत आहे. जेवढा उशीर केला जाईल तेवढा उशीर करावा. क्रिस्टल एजन्सीचे म्हणने बंधनकारक आहे परंतु ते जे सांगत आहे ते बरोबर आहे किंवा एजन्सीचे काम पहाणे हि आपली जबाबदारी आहे. प्रशासनानवर माझा आरोप आहे की, प्रशासनाने ठरवुन शिवसेना भाजपाची सत्ता येवु नये आमच्या काळात हे काम होउ नये म्हणुन हा डाव दिसतो, यास मुदत देउ नये, व्याज गेलेतरी चालेल जनतेला पाणी द्या जनतेला व्याजाशी काहीही देणे घेणे नाही आणि टाईम बॉन्डमधे आणि वेळ का वाढविला याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एखादी डेट दिली तर ती टाईमबॉन्ड असते. 02 तारीख वाढवुन दिली आहे तर 02 तारखेनंतर आलेले टेंडर घेणार आहात काय? मुदत वाढवुन देण्याचा अधिकार कुणाला आहे. समांतर जलवाहिनीसाठी सध्या जो निधी आलेला आहे तर असे धोरण आहे का की सर्व निधी आल्यानंतरच काम सुरू करायचे. आमचे तसेच शासनाचे असे धोरण आहे की, लवकरात लवकर पाणी मिळावे. खुलासा करण्यात यावा की, 17 तारखेची 02 तारीख कुठल्या ऑथरिटीने केली आणि कशासाठी केली. 02 तारखेनंतरही तारीख वाढणार नाही याची जबाबदारी कोण घेणार. स्थायी समितीने जो कार्यक्रम दिला आहे त्या प्रमाणे काम करू शकता की नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.विनायक पांडे : शहरातील सर्व जनता महानगरपालिकेकडे अपेक्षेने बघत आहे. कुणी जलवाहीनी मंजूर केली या वादात जायचे नाही परंतु जनतेला आज पाणी पाहिजे. शिवसेना भाजपची महानगरपालिकेत सत्ता आहे आपण सभापती

आहात आपल्या कार्यकाळात समांतर जलवाहिनीचे काम सुरू व्हायला पाहिजे याचे कटाक्षाने प्रयत्न केला पाहिजे. विचारलेल्या सर्व प्रश्नांचा सविस्तर खुलासा झाला पाहिजे.

श्री.नारायण कुचे : माझ्या वार्डात पाईपलाईन टाकुन ठेवल्यात प्रत्येक संचिकेवर लिहिले जाते की, जेव्हा समांतर जलवाहिनी होईल तेव्हा आम्ही पाणी देऊ. सहा सहा महिणे निधी बँकेत ठेवलातर पाणी केव्हा मिळेल. महानगरपालिकेत सत्तेवर असलेल्या पक्षांच्या कार्यकाळात हे काम होऊ नये म्हणुन ठरलेले आहे का? प्रशासन आपल्या सोबत आहे का? दोन दिवसांपासुन वार्डात पाणी नाही.

श्री.प्रशांत देसरडा : काम होणार नसेल तर शहर जायकवाडी येथे शिफ्ट करण्यात यावे.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी आदेश दिलेले आहे की, समांतर जलवाहिनीचे काम लवकरात लवकर व्हावे.

श्री.नारायण कुचे :प्रशासनाच्या बाजुने खुलासा का करता.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :17 तारखेची 02 तारीख का झाली.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :युडीआयएसएसएमटी (UDISSMT) अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठयाचा प्रस्ताव शासनाने 360 कोटींचा केलेला आहे. सर्वांना विदीत आहे, शासनाने 143.86 कोटी पहिल्या हप्त्यामधे उपलब्ध करून दिलेले आहेत. या बाबतीत सुरवातीपासुन योग्य असे टेंडरचे नियोजन केलेले आहे. हे जे टेंडर आहे ते नेहमीचे टेंडर नाही. सर्वसाधारण सभेने तसेच शासन स्तरावर ज्या वेगवेगळया बैठका झाल्यात त्या बैठकांमधे असे ठरलेले आहे की, योजना ही पब्लीक प्रॅव्हेट पार्टनरशिप या तत्वावर राबवावी. 360 कोटीची योजना आज साधारण 629 कोटींवर पोहचलेली आहे. वरचे 269 कोटी रूपये कोणी भरायचे महानगरपालिकेची आर्थीक स्थिती बरोबर नाही. UDISSMT ची जी योजना आहे ती 80:10:10 या पॅटर्न प्रमाणे आहे. 360 कोटीचे 80 टक्के केंद्र शासनाचे 10 टक्के राज्य शासनाचे 10 टक्के महानगरपालिकेचे 10 टक्के म्हणजे जवळपास 36 कोटी रूपये महानगरपालिकेचे सदरची रक्कम महापालिका आज रोजी टाकु शकत नाही या पार्श्वभुमिवर महानगरपालिकेने एक ठराव करून आयआरपीडीएफ केंद्रशासनाचा जो निधी असतो तो मिळावा आणि या निधीच्या अंतर्गत पीपीपी तत्वावर योजना राबविण्यासाठी अभ्यास करण्याला आपल्याला एजन्सी मिळावी अशा आशायाचा ठराव आणि पत्र केंद्र शासनाला पाठविले. त्याच्या अंतर्गत क्रिसील या संस्थेला शासनाने नेमुण आपल्या अभ्यासाठी इथे पाठविलेले होते. या पार्श्वभुमिवर 269 कोटी रूपये जास्त लागणार आहे. सदरची रक्कम कोणी टाकायची महापालिकेची आजची आर्थीक स्थिती बरोबर नाही. 269 कोटी टाकण्यासाठी पीपीपी अंतर्गत प्रॉयव्हेट ऑपरेटर या योजनेमधे समावेश करायचा आणि हि योजना पुर्णत्वाला न्यायची. सर्वसाधारण सभेने त्याबाबतची मान्यता दिलेली आहे त्यानुसार काम सुरू केलेले आहे. दोन स्टेजमधे टेंडर होते 1) RFQ ची टेंडर नोटीस काढली आणि पुर्ण देशपातळीवरचे प्रीबीडचे 22 लोक आलेले होते त्यातील 11

लोकांनी टेंडर भरलेले आहे देश पातळीवरचे तसेच अंतराष्ट्रीय पातळीवरच्या लोकांनी एकत्र येऊन Joint Venture म्हणून आपल्याकडे रस दाखविलेला आहे. 17 ही प्रिक्वालिफिकेशन तारीख होती. त्यावेळेस नऊ कंपण्यांनी लेखी स्वरूपात इमेल द्वारे विनंती केली महानगरपालिकेच्या अटी शर्ती जास्त आहे त्यामुळे एका एजन्सीकडुन काम होणार नाही. सोव्हीयत, मलेशिया सारख्या अंतराष्ट्रीय कंपन्या आहेत. Joint Venture करून काम करायचे आहे वेळ कमी पडत आहे म्हणुन 15 दिवस अजुन वेळ वाढवुन द्यावा अशा अशायाची विनंती केली. ppp प्रोजेक्ट राबवित आहे तो देशातला पहिला पथदर्शी प्रोजेक्ट आहे. केंद्र शासन एक पथदर्शी प्रकल्प म्हणुन या प्रकल्पाकडे पाहात आहे. अर्थ विभाग,नियोजन विभाग व इतर सर्व विभागांचे याकडे विशेष लक्ष आहे. केंद्र शासनाकडे तक्रार दिलेली आहे की वेळ कमी दिलेला आहे म्हणुन त्यांना वेळ वाढवुन द्यावा लागला. 02 तारखेला RFQ उघडण्यात आले आणि त्यात 11 लोकांचा सहभाग दिसुन आला. एका एका एजन्सीचे 20 ते 25 कागदपत्रे आहेत ते तीन प्रतीत घेण्यात आले. एक प्रत क्रिसील या संस्थेस तपासणीसाठी दिलेली आहे. येत्या आठ दिवसांमधे 11 पैकी कोणते लोक निवडले जाणार आहे याची यादीही मिळुन जाईल. 12 ते 15 तारखेपर्यंत यादी जाहिर करू. मा.आयुक्तांनी क्रिसील यासंस्थेस सांगीतले आहे की, सदरील प्रकल्प लवकरात लवकर सुरू करायचा आहे. 9 ते 10 तारखेपर्यंत मूल्यनिर्धारण करुन द्या शॉर्ट लिस्ट यादी देण्यात यावी. शॉर्ट लिस्ट यादी जेव्हा जाहिर होईल तेव्हा request for proposal हे मुख्य टेंडर स्विकारण्याची तयारी केलेली आहे. शॉर्ट लिस्ट यादी दहा ते पंधरा दिवसांमध्ये प्रसिध्द होईल त्यानंतर निवड झालेल्यांना RFQ डॉक्युमेंट देण्यात येईल व ते त्याचा अभ्यास करतील सदरील एजन्सी हया राष्ट्रीय अंतराष्ट्रीय स्तरावरील असल्यामुळे किमान त्यांना अभ्यास करण्यासाठी महिणाभर वेळ द्यावा लागेल. सुरळीत झाले तर जानेवारीच्या शेवटपर्यंत फायनल होईल.

श्री.प्रशांत देसरडा : क्रिसील एजन्सी जवळ मुबलक मनुष्यबळ व यंत्रणा छानणीसाठी असायला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : 17 तारखेची 2 तारीख मा.आयुक्तांच्या मंजूरीनंतरच दिली असेल.

मा.सभापती : नऊ कंपण्यांनी वेळ वाढवुन द्यावा म्हणुन विनंती केली होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रशासनाने आपल्या अधिकाराचा वापर करून स्थायी समिती टाईम बॉन्ड ठरवुन दिल्या प्रमाणे काम करावे.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे): टेन्टेटिव्ह प्रोग्राम जो आहे साधारणत: 12 ते 15 पर्यंत शॉर्ट लिस्ट होईल क्रिसीलला डॉक्युमेंट हॅन्डओव्हर केलेले आहे. 10 ते 12 तारखेपर्यंत नांवे जाहिर करण्यात येईल त्यानंतर RFQ डॉक्युमेंट देण्यात येईल. क्रिसील ने नुकत्याच झालेल्या बैठकीत सांगीतले की, RFQ डॉक्युमेंट फायनल होईल Agreement फायनल होईल व त्यास पुन्हा सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल. सुजल निर्मलच्या अंतर्गत बऱ्याच गोष्टींची सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे. RFQ टेंडर सर्व स.सदस्यांना दाखविण्यात

येईल. सर्व गोष्टी व्यवस्थितरित्या झाल्यावर जानेवारी शेवटपर्यंत फायनल होईल.

श्री.विनायक पांडे : समांतर जलवाहिनीचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागला पाहिजे. पाणी प्रश्नाची सर्वात जास्त समस्या माझ्या वार्डामधे आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जानेवारीच्या दहा ते पंधरा तारखेपर्यंत प्रशासनाने सर्व कार्यवाही पुर्ण करावी.

श्री.प्रशांत देसरडा : 26 जानेवारी रोजी समांतर जलवाहिनीचे उद्घाटन झाले पाहिजे.

श्री.नारायण कुचे : 26 जानेवारी रोजी समांतर जलवाहिनीचे उद्घाटन झालेच पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे : शहरात पाण्याची समस्या गंभीर स्वरुपाची आहे तीन तीन दिवस नागरीकांना पाणी मिळत नाही. प्रशासनाला हा प्रश्न लवकरात लवकर सुटावा असे वाटत नाही.

श्री.नारायण कुचे : सभा तहकूब करण्यात यावी, पाण्याचा प्रश्न आहे. 10 जानेवारी एजन्सी फिक्सींग व 26 जानेवारीला उद्घाटन या संदर्भात खुलासा करावा. नसता सभा होऊ देणार नाही. प्रशासनाचे उत्तर संयुक्तीक वाटत नाही मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे : क्रिसील जवळ यंत्रणा नाही काय? विषयास वेगळे वळन जावुन प्रशासनास पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. समांतर जलवाहिनी करण्याची इच्छा नाही काय? गुंठेवारीतही 700/- भरून घेतले व निघून गेले.

श्री.नारायण कुचे : माझ्या वार्डातील पाईपलाईन टाकण्यासाठी सर्व संचिकेवर लिहिण्यात आले की, समांतर जलवाहिनी झाल्याशिवाय पाणी सोडता येणार नाही. सभा तहकूब करा.

(स.सदस्य मा.सभापती यांचे समोर जावुन मोठमोठयाने बोलत असल्यामुळे काहीही ऐकु येत नव्हते.)

मा.सभापती : आजची सभा तहकूब करण्यात येते. शनिवार दिनांक 5 डिसेंबर रोजी दुपारी 3.30 वाजता तहकुब झालेली सभा घेण्यात येईल.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-१८)

## सुचना

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(१) व त्यास अनुसरून अनुसूची-ड, प्रकरण २ चे नियम क्र. ३ आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६६(१) अन्वये.)**

**दिनांक :- ०४/१२/२००९**

**सु च ना**

दिनांक ०४/१२/२००९ रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शनिवार, दिनांक ०५/१२/२००९ रोजी दुपारी ३.३० वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक १८) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद